SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०१ ● अंक : २७९ ● बुधवार, दि. ३१ जुलै २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये
● Volum : 1 ● Issue : 279 ● Wednesday, 31 July 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-

# पुणे पोलिसांनी तयार केली यादी

## आता नियम मोडणाऱ्या वाहनधारकांसमोर मोठे संकट



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरात नाही तर देशातील अनेक शहरांमध्ये काही वाहनधारक सातत्याने वाहतूक नियमांचे उल्लंघन करत असतात. त्या वाहन धारकांकडून नेहमी वाहतूक नियमांची पायमल्ली होत असते. मग कधी ओळख दाखवून, कधी चिरमिरी तर कधी दंड भरून ही लोक सुटत असतात. परंतु त्यानंतर पुन्हा वाहतूक नियमांचे पालन करत नाही. त्यामुळे पुणे पोलिसांनी आता कठोर भूमिका घेतली आहे. त्यासाठी एक नवीनच फंडा राबवण्यास सुरुवात केली आहे. सातत्याने वाहतूक नियम मोडणाऱ्यांची यादी पुणे पोलीस तयार करत आहेत. यामुळे आता सतत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे, पुण्याचे पोलीस आयुक्त अमीतेश कुमार यांनी याबाबत माहिती दिली.


पुणे शहरात 100 अन् 50 वेळा वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनांची यादी तयार केली जात आहे. त्यात 100 हून अधिक वेळा नियमभंग करणाऱ्या 21 वाहनधारक सापडले आहेत. तसेच 50 हून अधिक वेळा नियमभंग करणाऱ्या 988 वाहनांची यादी मिळाली आहे. आता अशा वाहनचालकांचा परवाना रद्द केला जाणार आहे. पुणे पोलिसांच्या या कडक कारवाईमुळे वाहन धारकांना रस्त्यावर वाहन चालवणेच अवघड होणार आहे.

पुणे शहरात राज्यात नाही तर देशात सर्वाधिक वाहनधारक आहेत. त्यामुळे पुणे शहरात वाहतुकीचा प्रश्न मोठा आहे. अनेक मुख्य रस्त्यांवर वाहतूक ठप्प होण्याचे प्रकार सातत्याने होत असतात. तसेच वाहनधारकांच्या चुकांमुळे छोटेमोठे अपघात होत असतात. आता पुणे शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्याचा निर्णय पुणे पोलिसांनी घेतला आहे. त्यामुळे वारंवार नियम मोडणाऱ्या वाहनधारकांचे वाहन परवानाच निलंबित होणार आहे.

### व्यावसायिक परवाना रद्द होणार

जर एखाद्या व्यावसायिक वाहन धारकाकडून नियम मोडला जात असेल तर त्याचा व्यावसायिक परवाना रद्द केला जाणार आहे. सातत्याने नियम मांडणाऱ्यांना आता कारवाईपासून सुटका होणार नाही. पोलीस आयुक्त अमीतेश कुमार यांनी याबाबत माहिती दिली.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com



नमस्कार तुमचं जनहितार्थ कार्य सुरु आहे पण स्पर्धेच्या दुनियेत आपल्याला व्यासपीठ मिळत नाही.
तर काळजी नसावी आम्ही तुमची तळमळ काम जनतेपर्यंत पोहचवू !





# शिक्षण-रोजगाराची सांगड मोलाची

असंघटित क्षेत्र, लघू आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि अप्रेंटिसशिप योजना यामुळे देशातील रोजगार लक्षणीय प्रमाणात वाढू शकतो हे लक्षात घेतले पाहिजे. भारतातील उत्पादनक्षेत्राचा अपेक्षित विस्तार झालेला नाही. त्यातही वाहन, वस्त्रोद्योग यांसारख्या रोजगारप्रधान क्षेत्रांमध्ये जास्त प्रणामात कामाच्या संधी निर्माण होण्याची गरज आहे. तसेच अजूनही शिक्षण आणि रोजगाराची अपेक्षित सांगड घालण्यात आपण यशस्वी झालेलो नाही. याखेरीज, निर्यातप्रधान उद्योगधंद्यांना चालना मिळाल्यास असंख्य तरुण-तरुणींना नोकऱ्या मिळू शकतील. मुद्रा योजनेंतर्गत कर्जवाटपात लक्षणीय वाढ झाली असली, तरी थकबाकीचे प्रमाण प्रचंड आहे. त्यामुळे केवळ लक्ष्यपूर्ती साधण्यासाठी दिखाऊ पद्धतीने योजना राबवणे चुकीचे आहे.
परामर्श – हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार

महाराष्ट्र शासनाने नुकतीच शिकाऊ उमेदवारांसाठी स्टायपेंड देण्याची योजना मांडल्याने अनेकांना नोकरीची संधी मिळू शकेल. देशातील उत्पादनक्षेत्राचा अपेक्षित विस्तार झालेला नाही. त्यातही वाहन, वस्त्रोद्योग यासारख्या रोजगारप्रधान क्षेत्रांमध्ये कामाच्या अधिक संधी निर्माण झाल्यास, शिक्षण आणि रोजगाराची अपेक्षित सांगड घातल्यास निर्यातप्रधान उद्योगधंद्यांना चालना मिळून असंख्य तरुण-तरुणींना नोकऱ्या मिळू शकतील. मालक आणि नोकरांचे संबंध औपचारिक असतात आणि किमान दहाजण कामाला असतात, अशा संघटनेला किंवा कंपनीला औपचारिक क्षेत्र मानले जाते; परंतु भारतात दहापेक्षा कमी कामगार कामाला असलेले अनौपचारिक क्षेत्र सगळ्यात मोठे आहे. भारतातील 80 टक्के मजूर हे अनौपचारिक क्षेत्रात काम करतात आणि 20 टक्के औपचारिक क्षेत्रात. यापैकी निम्मे मजूर शेतीमध्ये काम करतात आणि बाकीचे बिगर शेतीक्षेत्रात. असंघटित क्षेत्रात महिन्याच्या वेतनाऐवजी दिवसाची रोजंदारी दिली जाते. कामाचे सातत्य नसते. त्यामुळे ज्या दिवशी काम असते त्या दिवशी संध्याकाळी मजुरी घेणे असेच चालते. भारताची अर्थव्यवस्था ही मोठमोठ्या सरकारी, खासगी कंपन्या आणि त्यांची उलाढाल त्यामार्फत चालत नसून छोट्या-छोट्या व्यवहारांमधून चालते. फेरीवाले, टपरीवाले, हातगाडीवाले हे असंघटित क्षेत्रात येतात. ते स्वयंरोजगार प्राप्त करतात. पण या क्षेत्रात बऱ्याच प्रमाणात बिगरपावतीचा आणि रोखीतला व्यवहार चालतो. अर्थात आजकाल फेरीवाले, रस्त्यावरील स्टॉलवालेदेखील ऑनलाइन पेमेंट स्वीकारतात, हा भाग वेगळा. जास्तीत जास्त व्यवसाय-उद्योग हे डिजिटल अर्थव्यवस्थेमध्ये आल्यास रोखीचे अथवा काळे व्यवहार कमी होतील, हे सरकारचे धोरण आहे. त्या दिशेने पावले पडत आहेत, हे वास्तव आहे. नुकताच केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी विभागाने 2022-23 चा एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्राचा अनौपचारिक उद्योग-धंद्यांमध्ये सिंहाचा वाटा असल्याचे दिसून आले. ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही क्षेत्रांमधील असंघटित उद्योगामध्ये ही राज्ये पुढे आहेत. कोरोना संपल्यानंतरच्या



2022-23 या वर्षात गुजरात, हरियाणा, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, तामिळनाडू यांसारख्या राज्यांमधील असंघटित उद्योगांचा वाटा कमी झाला. विशेष म्हणजे बीमारू म्हणून हिणवल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेशमध्ये गेल्या पाच-सात वर्षांमध्ये उत्तम प्रगती झाली आहे. कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती तर सुधारली आहेच. परंतु रस्ते, उड्डाणपूल, विमानतळ, शिक्षणसंस्था या सर्व आघाड्यांवर या राज्याने प्रगती केली आहे. परंतु उत्तर प्रदेशमध्ये असंघटित उद्योगांच्या संख्येमध्ये 13 टक्के, पश्चिम बंगालमध्ये 12 टक्के तर महाराष्ट्रात नऊ टक्के इतकी भर पडली आहे. 2015-16 मध्ये या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या संख्येतील वाढीचा वेग कमी झाला होता. उलट, राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालानुसार 2022-23 या काळात आंध्र, आसाम, उत्तर प्रदेश, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये असंघटित क्षेत्रातील उद्योगधंद्यांमधील कामगारांच्या संख्येत वाढ झाली, ही नक्कीच दिलासादायक आकडेवारी आहे. महाराष्ट्रात या क्षेत्रात 2015-16 मध्ये 91 लाख कामगार काम करत होते, ते प्रमाण 2021-22 मध्ये 98 लाख आणि 2022-23 मध्ये एक कोटी 15 लाखांवर जाऊन पोहोचले. मात्र उत्तराखंड, आसाम, छत्तीसगड, दिल्ली आणि जम्मू-काश्मीर या राज्यांमध्ये असंघटित क्षेत्राची वाढ अत्यंत कमी प्रमाणात झाली. देशातील अर्थव्यवस्थेत अनौपचारिक क्षेत्र हे रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे ही आकडेवारी पाहणे गरजेचे असते. 2022-23च्या आकडेवारीनुसार, या क्षेत्रात जवळपास 11 कोटी कामगार काम करत आहेत. यापैकी पाच कोटी 72 लाख कामगार हे शहरातले तर पाच कोटी 24 लाख कामगार हे ग्रामीण भागातले आहेत. असंघटित क्षेत्रातील ही वाढ 2021-22 च्या तुलनेत एक कोटींपेक्षा जास्त आहे. भारतातील एकूण बेरोजगारांमध्ये तरुणांचे प्रमाण 83 टक्के आहे. बड्या कंपन्यांची कामगिरी चांगली आहे पण उच्चशिक्षितांकडे उच्च दर्जाची कौशल्ये आहेत, त्यांनाही चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळत आहेत. परंतु अतिशय छोटे छोटे उद्योग आणि असंघटित क्षेत्रातील युनिट्स अस्तित्वासाठी झगडत आहेत.त्यांच्या क्षमतांचा अपेक्षेइतका विस्तार होत नाही. त्यामुळे या क्षेत्राच्या गरजांकडे लक्ष पुरवण्याचे आवाहन नुकतेच नीती आयोगाचे माजी उपाध्यक्ष राजीव कुमार यांनी पंतप्रधानांना उद्देशून केले. लघू आणि मध्यम उद्योगांवर भर द्यावा, असेही त्यांनी म्हटले आहे. या क्षेत्रासाठीचे नियम शिथिल करण्याची त्यांची सूचना आहे. असंघटित क्षेत्रातील कामगार धोकादायक परिस्थितीत काम करतात. त्यांना आरोग्याच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. कमी मोबदला मिळत असल्याने ते कुपोषणाने ग्रस्त आहेत, आपला वैद्यकीय खर्च करण्यास असमर्थ आहेत. फटाक्यांच्या किंवा तंबाखूच्या कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना श्वसनाचा त्रास आणि आजार होतात. कीटकनाशके आणि खतांच्या अतिवापरामुळे कृषी क्षेत्रात गुंतलेले कामगार प्रभावित होतात. त्यामुळे त्यांचे आरोग्य बिघडते. असंघटित क्षेत्रात काम करणारे कामगार अस्वच्छ परिस्थितीत, झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. तिथे पिण्याचे शुद्ध पाणी, धुण्याची जागा, शौचालय सुविधा इत्यादी मूलभूत सुविधांचा अभाव आहे. पुरुष कामगारांना समान तासांच्या कामासाठी महिला आणि बाल कामगारांच्या तुलनेत जास्त वेतन मिळते. लहान मुलांना ढाबे, चहाची दुकाने, घरोघरी अशा क्षुल्लक नोकऱ्यांमध्ये दीर्घ तास काम करण्यास भाग पाडले जात आहे. त्यामुळे त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम होतो. दुसरीकडे, महिला कर्मचारीदेखील कामाचे दीर्घ तास आणि धोकादायक परिस्थितीपासून मुक्त नाहीत. असंघटित क्षेत्रातील कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ आणि हल्ल्यांना बळी पडतात. त्याचा त्यांच्यावर केवळ शारीरिक आणि मानसिक नव्हे, तर भावनिक प्रभावही पडतो; शिवाय महिला आणि मुलांना त्यांच्या हक्कांची जाणीव नाही. भारतीय राज्यघटना कामगार वर्गाच्या संरक्षण आणि कल्याणासाठी एक चौकट प्रदान करते. हे संघटित आणि असंघटित कामगार शक्तीमध्ये फरक करत नाही. कलम 23 सक्तीच्या मजुरीवर बंदी घालते आणि कलम 24 मध्ये 14 वर्षांपर्यंतच्या धोकादायक व्यवसायात बालमजुरीवर बंदी घालण्याची तरतूद आहे. अनुच्छेद 39(अ) मधील तरतुदीनुसार राज्य आपल्या नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दिशेने धोरण निश्चितपणे निर्देशित करेल. पुरुष असो वा महिला; दोघांना उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा समान हक्क आहे. असंघटित कामगारांची दुर्दशा दुःखद आणि भीषण आहे. ते शोषण, गरिबी आणि भेदभावाच्या जाळ्यात अडकले आहेत. प्रत्येक नागरिकाचा मूलभूत मानवी हक्क असलेल्या सामाजिक सुरक्षिततेला सरकारच्या दयेवर ठेवता कामा नये, तर त्याकडे कायदेशीर हक्कांच्या नजरेतून पाहिले पाहिजे. असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा कायदा चांगला आहे; परंतु तरीही त्यात खूप सुधारणा करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने नुकतीच शिकाऊ उमेदवारांसाठी स्टायपेंड देण्याची योजना अर्थसंकल्पात मांडली आहे. त्यामुळे अनेकांना कामाचे शिक्षण आणि पाठ्यवेतन घेतल्यानंतर नोकरीची संधीही मिळू शकेल.

## थोडक्यात

### पुणे शहरातल्या महसुलामध्ये योग्य तरतूद करण्याची गरज : देशपांडे



पुणे (आरंभ पर्व) : अन्न सुरक्षा योजनेसाठी शासन निर्णयानुसार वार्षिक उत्पन्न शहरीभागासाठी 59000 रु. पेक्षा कमी असणाऱ्या व ग्रामीण भागासाठी 44000 रु. पेक्षा कमी असणाऱ्या PHH शिधा पत्रिका धारकांनी दोन महिना शिधा घेतला नाही म्हणून त्यांच्या शिधा पत्रिका अन्नधान्य वितरण प्रशासनाने बंद केलेल्या आहेत. येणाऱ्या सणासुदीच्या खासकरून गणपती व दसरा, दिवाळी सणांच्या पार्श्वभूमीवर PHH शिधा पत्रिका प्रशासनाने ज्या बंद केलेल्या आहेत त्या तात्काळ सुरु करण्यात याव्यात, अशी मागणी भा.ज.प. पुणे शहराचे उपाध्यक्ष श्री शाम देशपांडे यांनी आज पत्रकार परिषदेत केली आहे. हया विषयी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुखमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, राज्य कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील तसेच केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ ह्यांच्याशी देखील पत्रव्यवहार केला आहे. पुणे शहरामध्ये जवळपास 30% PHH शिधा पत्रिका या कारणास्तव बंद झालेल्या आहेत. ही संख्या मोठी असून या सर्वांची परिस्थती हलाखीची आहे. तसेच नवीन शिधा पत्रिकाधारकांनाही तात्काळ या योजनेचा लाभ मिळावा अशी देखील मोठी मागणी आहे. संबंधित अन्नधान्य वितरक अधिकारी मान्य केलेला इष्टांक सांभाळण्यासाठी जाणून बुजून दोन महिन्याचा नियम लावून धान्य वितरण बंद करत आहेत. हे टाळण्यासाठी प्रत्येक शहरासाठी PHH कार्डचा इष्टांक तात्काळ वाढवण्याची गरज आहे.' असे ही श्री देशपांडे यांनी नमूद केले. प्रशासनाने तातडीने ह्याची दखल घेवून, दोन महिने शिधा न घेतल्यास तात्काळ PHH शिधा पत्रिका बंद करण्याची अट रद्द करावी, त्यामुळे अनेक गोरगरीब नागरिकांना धान्यापासून वंचित राहण्यापासून दिलासा मिळेल असे देशपांडे म्हणाले.

# मुरादपूर पातीचीवाडी ग्रामस्थांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

## आमची साथ सदैव शेखर निकम यांनाच : मुरादपूर पातीचीवाडी ग्रामस्थ

**चिपळूण (दै. आरंभ पर्व)** संगमेश्वर मतदार संघात गेले काही दिवस राजकीय घडामोडीला वेग धरला असून, राष्ट्रवादीत पक्षप्रवेशाचा ओघ सुरू आहे. आमदार शेखर निकम यांची नियोजनबद्ध कामाची पद्धत, विकास कामांचे दिलेले शब्द लिलया पेलण्याचे कसब, अधिवेशनामध्ये जनतेचे प्रश्न मांडून त्याचा पाठपुराव करून मार्गी लावण्याची कला, संयमी अशा नेतृत्वाने जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवत लोकांच्या मनात



मानाचे स्थान मिळवीले आहे आणि त्यामुळेच जनता त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत आहे. संगमेश्वर तालुक्यातील मुरादपूर पातीचीवाडी ग्रामस्थांनी जनसंपर्क कार्यालय, सावर्डे येथे आमदार शेखर निकम यांची भेट घेवून पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत त्यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून सरपंच दिक्षा बांडागळे व वाडी प्रमुख शिवराम बांडागळे यांच्या पुढाकाराने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. आमदार साहेबांचा प्रेमळ स्वभाव व कामाची पद्धतीवर मुरादपुर पातीचीवाडी ग्रामस्थ कमालीचे खूश झाले व त्यांनी सरांसोबत राहण्याचा निर्णय घेतला व राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला आणि एकच निर्धार केला आता कोणतीही घडामोड होवो काहीही होवो आमच एकच लक्ष,,, आमदार शेखर निकम हाच आमचा पक्ष.... आम्ही सदैव शेखर सरानाच कायम खंबीर साथ देणार.. प्रवेश कर्त्यांमध्ये सरपंच दिक्षा बांडागळे, वाडी प्रमुख शिवराम बांडागळे, दिनेश बांडागळे, दत्ताराम चोगले, राकेश बांडागळे, संदेश रेवाळे, राज बांडागळे, महेंद्र बांडागळे, दिपक कोटकर, रामचंद्र बांडागळे, राजू बांडागळे, पांडुरंग चिले, सायली बांडागळे, सुंदरा बांडागळे यांचा समावेश आहे. पक्ष प्रवेश कर्त्यांना मार्गदर्शन करताना आमदार शेखर निकम म्हणाले की मतदारसंघातील सर्वच गावातील ग्रामस्थ हे माझ्या कुंटुबा प्रमाणे आहेत. आपण माझ्यावर विश्वास ठेऊन पक्ष प्रवेश केलात त्याबद्दल तुमचे आभार व पक्षामध्ये स्वागत. यापुढे आपल्या वाडीतील समस्या व अडचणी या आपण सर्वांनी एकत्र येऊन पाठपुरावा करून सोडवण्याचा निश्चित प्रयत्न करू. तुम्ही माझ्यावर ठेवलेल्या विश्वासाला मी किंचितही तडा जाऊ देणार नाही. गावातील प्रलंबीत कामे टप्या-टप्याने पुर्ण करु असा ग्रामस्थाना विश्वास दिला. यावेळी राजू पोमेंडकर, बाळा पंदेरे, मंगेश बांडागळे, यशवंत गोपाळ, नितीन भोसले, नितीन बांडागळे, तुकाराम मेस्त्री, राजा भेरे आदि पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थितीत होते.

### थापर विद्यापीठाला आरआयबीए इंटरनॅशनल अवॉर्ड्स फॉर एक्सलन्स 2024

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

थापर युनिव्हर्सिटी लर्निंग लॅबोरेटरीला प्रतिष्ठित रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ ब्रिटिश आर्किटेक्ट्स इंटरनॅशनल अवॉर्ड्स फॉर एक्सलन्स 2024 ने सन्मानित करण्यात आले आहे. मैकुलो मुलविन आर्किटेक्ट्स ने डिजाइनप्लस एसोसिएट्स सर्विसेज च्या सहकार्याने डिझाइन केलीली ही अत्याधुनिक सुविधा आकर्षक भौमितिक वास्तुकला आणि नाविन्यपूर्ण डिझाइनसाठी ओळखली गेली आहे. पटियाला, पंजाब येथे स्थित, लर्निंग लॅबोरेटरी ही तीन प्रिझमॅटिक लाल आग्रा दगडांनी बांधलेल्या टॉवर्सची एक गतिशील जोड आहे ज्यामध्ये विज्ञान इमारत, ग्रंथालय आणि लेक्चर थिएटर आहेत.



**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व) :** आई-वडिलांची आणि स्वत:ची स्वप्नं पूर्ण करण्याची इच्छा तर प्रत्येकाचीच असते. तसं ते चांगलंही आहे यासाठी परस्थितीची जाणीव जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास महत्त्वाचे आहे. पण अशी फारच थोडी व्यक्ती असतात, जी गरीब आणि निराधार मुलांची स्वप्नं पूर्ण करणं हेच आपल्या आयुष्याचं ध्येय बनवतात, आपल्याला काहीतरी करायला हवं. या मुलांमध्ये शिकण्याची जिद्द आहे, पण त्यांना आर्थिक परिस्थितीमुळे शिकता येत नाही. अशा विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी समाजातील मंडळीने पुढे आले पाहिजे शिक्षणासाठी त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे मत श्री शंकर बाबासेवा प्रतिष्ठान ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मारुती शंकर पवार यांनी व्यक्त केले. धर्मवीर शंभूराजे प्रतिष्ठान वृद्ध आश्रम तसेच अनाथ निराधार विद्यार्थ्यांना अन्नदान वाटप करण्यात आले. शंकर बाबासेवा प्रतिष्ठान ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने वाटप करण्यात आले. यावेळी इंस्टाग्राम स्टार कु.माधवी राजेश कुंभार, कृणाल दादा चौरे, कु.करण अडागळे आदी धर्मवीर शंभूराजे प्रतिष्ठान वृद्ध आश्रमचे कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# म्युझिगलने वाकड, पुणे येथे त्यांची संगीत अकादमी सुरु केली

- म्युझिगल ने आज तिसरी अकादमी सुरू केली आणि लवकरच आणखी दोन अकादमी सुरू केल्या जातील.
- म्युझिगल संघटित संगीत शिक्षण उद्योगात एक प्रमुख खेळाडू म्हणून स्वत:ला प्रस्थापित करत आहे, त्याची पोहोच वाढवत आहे आणि चांगला प्रभाव पाडत आहे



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

म्युझिगल , भारतातील सर्वात मोठे संगीत शिक्षण व्यासपीठ, वाकड, पुणे परिसरात असलेल्या पुण्यातील तिसऱ्या संगीत अकादमीच्या भव्य शुभारंभाची अभिमानाने घोषणा करते. 1244 Sqft मध्ये पसरलेली, नवीन अकादमी गायन आणि वाद्य संगीत दोन्ही शिक्षणासाठी अतुलनीय शिक्षण वातावरण देते. उद्घाटनाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री श्याम राज (प्रख्यात सॅक्सोफोन वादक) आणि मयूर दत्ता (मुख्य संगीतकार - इंडियन आयडॉल, सोनी टेलिव्हिजन) आणि उदीक्ष सूद (उपाध्यक्ष - मुझिगल) हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

2020 मध्ये त्याच्या स्थापनेपासून, म्युझिगल ने संघटित संगीत शिक्षण उद्योगात एक प्रबळ शक्ती म्हणून वेगाने स्वतःची स्थापना केली आहे. भारतभरात 59 पेक्षा जास्त अकादमी आणि 2025 पर्यंत 100 पेक्षा जास्त अकादमींचे उद्दिष्ट असलेले, म्युझिगल संगीत शिक्षण कसे दिले जाते ते पुन्हा परिभाषित करत आहे. बालेवाडी-बाणेर अकादमी ही अनेक बॅचमध्ये , 500 हून अधिक विद्यार्थ्यांना सामावून घेण्याची क्षमता असलेल्या उच्च-स्तरीय संगीत शिक्षण सुविधा प्रदान करण्याच्या म्युझिगल च्या वचनबद्धतेचा पुरावा आहे.

म्युझिगल अकादमी पियानो, कीबोर्ड, गिटार, ड्रम्स, कर्नाटकी वोकल्स, हिंदुस्थानी गायन, वेस्टर्न वोकल्स, व्हायोलिन आणि उकुले यासह सर्वसमावेशक अभ्यासक्रम उपलब्ध करते. म्युझिगल संगीत शिकणे आणि शिकवण्यासाठी एक 360 -डिग्री फ्रेमवर्क प्रदान करते, ऑनलाइन, ऑफलाइन आणि संगीत इन्स्ट्रुमेंट रिटेल एका एकसंध प्लॅटफॉर्ममध्ये एकत्रित करते. उद्घाटन महिन्यासाठी, म्युझिगल सर्व नावनोंदणीसह एक महिन्याचे मोफत संगीत शिक्षण देत आहे, संगीत शिक्षण सर्वांना उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या ध्येयावर भर देत आहे.

लाँच इव्हेंटमध्ये, डॉ. लक्ष्मीनारायण येलुरी यांनी संगीत शिक्षणाचे लोकशाहीकरण करण्याच्या मुझिगलच्या ध्येयावर प्रकाश टाकला: " म्युझिगल अकादमी शिकणाऱ्यांना त्यांच्या समुदायातील अत्याधुनिक शिक्षण केंद्रात प्रवेश प्रदान करून आमच्या ध्येयावर आधारित आहे. ही अकादमी सर्वोत्तम शिक्षण देते. आणि तज्ज्ञ शिक्षकांद्वारे शिकविले जाणारे भारतीय शास्त्रीय आणि पाश्चात्य संगीतातील विस्तृत अभ्यासक्रमांसाठी संगीत शिकवण्याचा अनुभव."

मुझिगलचा संरचित अभ्यासक्रम, नियतकालिक मूल्यमापन, प्रमाणन, लवचिक शुल्क भरणा योजना आणि उच्च प्रशिक्षित शिक्षक शिकाऊ-केंद्रित दृष्टिकोन सुनिश्चित करतात. अकादमीचे वातावरण आणि पायाभूत सुविधा संगीताच्या प्रतिभेला प्रेरणा देण्यासाठी आणि त्यांचे संगोपन करण्यासाठी डिझाइन केल्या आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या संगीत प्रवासासाठी एक स्पष्ट आणि तयार केलेला रोडमॅप मिळेल.

म्युझिगल च्या पुण्यातील विस्ताराच्या योजनांमध्ये आगामी बिबवेवाडी लाँचचा समावेश आहे, जे दर्जेदार संगीत शिक्षण व्यापकपणे उपलब्ध करून देण्याची त्यांची वचनबद्धता दर्शवते. "संगीत योग्य मार्गाने शिका" ही टॅगलाइन संगीत शिक्षणासाठी एक संरचित आणि उद्देशपूर्ण दृष्टीकोन प्रदान करण्याच्या मुझिगलच्या समर्पणाचा अंतर्भाव करते, हे ओळखून की प्रत्येक विद्यार्थी अद्वितीय आहे आणि त्याला वैयक्तिकृत शिक्षण मार्ग आवश्यक आहे.

म्युझिगल अभ्यासक्रम केवळ संगीत प्रवीणता विकसित करण्यासाठीच नाही तर संज्ञानात्मक क्षमता आणि जीवन कौशल्ये वाढवण्यासाठी देखील तयार करण्यात आला आहे. मुझिगल येथील संगीत शिक्षण स्मरणशक्ती, मोटर समन्वय आणि आकलन कौशल्ये सुधारते, तसेच जबाबदारी, शिस्त आणि चिकाटी यासारखे गुण वाढवते. म्युझिगल चा असा विश्वास आहे की खरे संगीत शिक्षण चांगल्या गोलाकार व्यक्तींचे पालनपोषण करते जे वास्तविक-जगातील आव्हानांना आत्मविश्वासाने नेव्हिगेट करू शकतात.

पीएन कमर्शियल स्पेस, 132 / 23, फिओनिक्स मॉल ऑफ मिलेनियमच्या बाजूला, शंकर कलाट नगर, वाकड, पुणे, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र 411057

# सामाजिक उत्तरदायित्व म्हणजे दानधर्म नाही - कैलाश सत्यार्थी

**• भारतीय सामाजिक दायित्व क्षेत्राच्या दशकातील कामगिरीचा गौरव • कॉर्पोरेट क्षेत्राची बांधिलकी आणि सामाजिक बदलाच्या वाटेवरील मैलाचा दगड पार • भारतीय CSR के दस साल: आगले दस साल बेमिसाल**



**पुणे (दै. आरंभ पर्व)** कॉर्पोरेट क्षेत्राने सामाजिक दायित्व क्षेत्रात गुंतवणूक करण्याचा नियम अमलात आल्याला दहा वर्षे पूर्ण झाली आहेत. कॉर्पोरेट क्षेत्राने समाज ऋणाची परतफेड करण्याच्या वाटेवरील हा एक मैलाचा दगड पार झाला आहे. या दशकभरात सामाजिक दायित्व क्षेत्रात गुंतवणूक हा कॉर्पोरेट धोरणाचा एक महत्त्वाचा हिस्सा बनला आहे आणि यातूनच देशभरात सामाजिक परिवर्तन आणि विकास याला चालना मिळाली आहे. भारतात “सामाजिक दायित्व क्षेत्रात गुंतवणूक” नियमाची दशकपूर्ती निमित्तच्या या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन मुंबईत राज भवनात करण्यात आले. महाराष्ट्राचे राज्यपाल या सोहळ्याचे प्रमुख अतिथि होते तर नोबेल पुरस्कार विजेते कैलास सत्यार्थी सन्माननीय अतिथि म्हणून उपस्थित होते. या शानदार सोहळ्यात कॉर्पोरेट क्षेत्राच्या सामाजिक दयित्वाच्या अढळ बांधीलकीचा गौरव करण्यात आला. पुरस्कार वितरणाबरोबरच या समारंभात “भारतीय CSR के दस साल: अगले दस साल बेमिसाल” या पुस्तकाचे प्रकाशन झाले. जीवन गौरव पुरस्कार विजेते डॉ. भास्कर चटर्जी आणि डॉ. नयन मित्रा हे या पुस्तकाचे लेखक आहेत. हे पुस्तक म्हणजे भारतातील सामाजिक दायित्व क्षेत्रातील कॉर्पोरेट क्षेत्राच्या गुंतवणूकीला दिलेली पावती आहे तसेच त्याच्या भविष्यातील वाटचालीची दिशाही आहे. “गेल्या दहा वर्षात सामाजिक दायित्व क्षेत्रात उत्तम कामगिरी केलेल्या कंपन्यांच्या कामाचा गौरव या पुरस्कारांतून होतो. त्यांचे कष्टप्रद आणि निस्वार्थी कार्य अत्यंत मौल्यवान आहे,” असे विचार हुजाइफा खोराकीवाला, अध्यक्ष, भारतीय सामाजिक दायित्व दशकपूर्ती आयोजन मंडळ, यांनी व्यक्त केले. कंपन्यांनी सामाजिक दायित्व क्षेत्रात केलेल्या कामगिरीची दखल घेणे तसेच या क्षेत्राबद्दलची सामाजिक विकासाची जाणीव करून देणा-या या सोहळ्याला कॉर्पोरेट क्षेत्रातील अजंठा फार्मा, कोल इंडिया, गॅस ऑथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड , हिंदुस्तान युनिलिव्हर , आय टी सी , आयुर्विमा महामंडळ, महिंद्र अँड महिंद्र, नवनीत एज्युकेशन, एन टी पी सी , पेट्रोनेट एल एन जी, स्टेट बँक अशा नामवंत कंपन्यांचे सर्वोच्च पदांवरील अधिकारी आवर्जून उपस्थित होते. त्यांनी पुरस्कार स्वीकारले आणि त्यांच्या कंपन्यांच्या सामाजिक दायित्व प्रकल्पांची माहिती दिली. माइंडक्युब मल्टीसर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या एमडी अर्पिता एस. राय यांनी कार्यक्रम आयोजित करण्यात मोलाचा वाटा उचलला आहे आणि तिचे महत्त्वपूर्ण योगदान त्याच्या यशात महत्त्वाचे आहे.

# आ. भीमरावअण्णा तापकीर यांनाच मताधिक्य मिळणार

## खडकवासला विधानसभा भाजपा ग्रामीणचे अध्यक्ष नवनाथ भाऊ तागुंदे यांची माहिती





**पुणे (दै. आरंभ पर्व)** खडकवासला ग्रामीण भागामध्ये आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनी अत्यंत चांगले काम केले आहे. जवळपास सुमारे 27 कोटी रुपयांची कामे त्यांनी या भागात केली आहेत. कोणतेही राजकारण न आणता प्रत्येक गावाला न्याय देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यामुळे येथील मतदार हा त्यांच्या कामाबद्दल आनंदीं आहे त्यामुळे आमदार भीमराव अण्णा तापकीर यांना ग्रामीण भागातून मताधिक्य मिळेल अशी माहिती खडकवासला ग्रामीण भाजपा अध्यक्ष नवनाथभाऊ तागुंदे यांनी दैनिक आरंभपर्व इलेक्शन टॉक सदरामध्ये दिली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अनौपचारिक संवाद साधला .

आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनी ग्रामीण भागात चांगले काम करूनही विरोधक नावे ठेवतात.जाणीवपूर्वक फेक नरेटिव्ह पसरवण्याचे काम विरोध करत आहेत.

या भागातील प्रश्नासाठी आमदार भीमराव अण्णा तापकीर सातत्याने आवाज उठवत आहेत. या भागातील अनेक रस्ते पायाभूत सुविधा व विविध विकास कामे करण्यासाठी त्यांनी शासनाकडून 27कोटी निधी आणला आहे. लोकसभा निवडणुकीचा आणि या निवडणुकीमध्ये खूप मोठा फरक आहे. फेक नरेंटीव्ह व इतर काही कारणामुळे ग्रामीणमध्ये आम्ही कमी पडलो. मात्र आगामी काळामध्ये त्याची भरपाई विधानसभेमध्ये काढून मोठ्या मतधिक्यानी भारतीय जनता पार्टीचा उमेदवार विजय होणार आहे. मात्र खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये इच्छुक कितीही असले तरी येथे भारतीय जनता पार्टीचाच आमदार होणार असल्याचं ही तागुंदे यांनी सांगितले.

भारतीय जनता पार्टीमध्ये पदापेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य दिले जाते.पक्षश्रेष्ठी सांगतील त्याप्रमाणे भारतीय जनता पार्टी ग्रामीण भागामध्ये काम करणार आहे.

मात्र या भागाची नस ओळखणारा भीमराव अण्णा तापकीर यांच्यासारखा दुसरा नेता कोणताही नाही. त्यामुळे त्यांनाच संधी मिळावी अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे. असे ही पुढे बोलताना नवनाथ तांगुदे यांनी सांगितले.नवनाथ तागुंदे यांनी भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ता ते विधानसभा ग्रामीण अध्यक्ष म्हणून काम केले आहे. खडकवासल्याच्या ग्रामीण भागामध्ये भारतीय जनता पार्टीच्या यशात त्यांचा महत्त्वाचा वाटा असतो. गेल्या वर्षभरापासून ते भाजपा विधानसभा ग्रामीणअध्यक्ष म्हणून कार्य करत आहेत. खडकवासला मतदारसंघांतील ग्रामीण भागाच्या विकासासाठी ते प्रयत्न करत असतात.



## अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप यांनी प्रत्यक्ष जाऊन नागरिकांना दिला दिलासा

**पुणे (दै. आरंभ पर्व)** पुण्यातील पूरग्रस्त भागातील सिंहगड रोड, एकता नगर, प्रगती पार्क, निंबज पार्क, विठ्ठल नगर व परिसरातील पूरग्रस्त भागात परिस्थिती पूर्व पदावर आणण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न सुरु असून जवळपास 85 % भागातील परिस्थिती सामान्य झाली आहे. याकामी महाराष्ट्र राज्य सरकारने तातडीने लक्ष घालून तज्ञ मंडळींना पाचारण केले होते. तसेच, पुणे महानगरपालिका प्रशासनाने ही उत्तम प्रकारे काम करून नागरिकांना दिलासा दिला आहे. नागरिकांच्या घरातील चिखल राडारोडा सर्व साफ करून रस्त्यांवरही साफसफाई करून औषध फवारणी करण्यात आली आहे. महानगरपालिकेचे उपायुक्त श्री. शिंदे साहेब यांनी व्यक्तीशः उपस्थित राहून सर्व कामे करून घेतली आहेत.स्वतः अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप यांनी प्रत्यक्ष सर्व ठिकाणी जाऊन नागरिकांना दिलासा दिला आहे. त्यांचे समवेत सोमशेखर कामतगी, सर्वज्ञ परदेशी, राजाभाऊ कदम, नाना राऊत, अनिल वाडकर, अमित जवळकर, राहुल जोशी, साईराज पाष्टे, प्रथमेश परदेशी यांच्यासह अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप मित्र परिवाराचे सर्व सहकारी या मदतकार्यात सहभागी होते.

# थोडक्यात



## वडगाव बुद्रुकमधील रक्तदान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (आरंभ पर्व) :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री, कुशल प्रशासक आणि विद्यमान गृहमंत्री मा ना देवेंद्रजी फडणवीससाहेब यांच्या वाढदिवसानिमित्त माजी नगरसेवक हरिदास कृष्णा चरवड यांच्या माध्यमातून वडगाव बुद्रुक येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. संततधार पाऊस असतानाही असून देखील ह्या शिबिरास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रेड प्लस ब्लड बँकेच्या सहकार्याने आयोजित या शिबिरात 75 रक्त पिशव्या संकलित झाल्या. दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अनिल अण्णा चरवड, संदीपतात्या चरवड, जनार्दन खाडे पा., एडवोकेट दिलीप गायकवाड, भाजप युवा मोर्चाचे सारंग नवले रा. स्व. संघाचे जितेंद्र चंपानेरकर, विद्याचरण मनेरे, डॉ.विवेक काळे, सुहास पवार, रामदास शेळके, किरण जाधव, केदारनाना जाधव, चंद्रकांत पवळे, सुनील चरवड, विनोद डागा, मच्छिंद्र गायकवाड, प्रकाश चरवड, पंकज फुले आदी मान्यवरांसह रेड प्लस ब्लड बँकेचे डायरेक्टर पोपट शिंदे, रूपेश पाकुलकर आणि वैद्यकीय अधिकारी तसेच परिचारिका उपस्थित होत्या.



## ग्रामपंचायत कार्यालयाचे उद्घाटन व विविध विकास कामांचे भूमिपूजन

**उरूळी कांचन (आरंभ पर्व) :** पूर्व हवेली तालुक्यातील कोरेगावमूळ येथे नवीन ग्रामपंचायत कार्यालयाचे उद्घाटन समारंभ उद्योजक पै.गोरख भाऊ बबनराव कानकाटे पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. तसेच विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यमान सरपंच कु.मंगेश अशोक कानकाटे पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले.



## ग्रंथ जीवनाला आकार व खोली देतात - अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)** दर्जेदार ग्रंथ जीवनाला आकार व खोली देत असतात. त्यामुळे वाचनसंस्कृतीचा संस्कार विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये रुजवून समृद्ध जीवनाचा मार्ग शोधावा असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी वाड्मय मंडळ उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर पुण्याच्या अक्षरपेरणी नियतकालिकाचे संपादक बाळासाहेब घोंगडे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे उपस्थित होते.

# जवळपास 2300 कोटी रुपयांचे भूखंड हिल टॉपक्षेत्रातून हटवले जाणार, झोपडपट्टी रहिवाशांना त्रास सुरुच



**पुणे (दै. आरंभ पर्व)** बिबवेवाडीतील सुमारे 7 एकरांचे तीन भूखंड हिल टॉप/ हिल स्लोप (टेकडी/उतार) क्षेत्रातून काढून टाकण्यात येणार आहेत. राज्य सरकारने अलीकडेच विकसकाच्या मालकीचे भूखंड रद्द करण्यासाठी सूचना आणि आक्षेप नोंदवणारा आदेश जारी केला.

विशेष म्हणजे, आसपासची शेकडो एकर जमीन, जिथे गरीब आणि मध्यमवर्गाने घरे बांधली आहेत, ती अजूनही हिल टॉप/ हिल स्लोप (टेकडी/उतार) क्षेत्रातच आहे. हा निर्णय झाल्यानंतर 2300 कोटी रुपयांची विकास क्षमता असलेला भूखंड वगळता परिसरातील इतर सर्व बांधकामे बेकायदेशीर मानली जातील.

हिल टॉप /हिल स्लोप (टेकडी/उतार) आरक्षणामुळे भूखंडांवर कोणतेही बांधकाम करणे अशक्य असते आणि जे आधीच उभे आहे, ते बेकायदेशीर मानले जातात. बिबवेवाडीतील बहुतांश जमीन 1987 च्या पुणे विकास योजनेत हिल टॉप / हिल स्लोप (टेकडी/उतार) मध्ये समाविष्ट करण्यात आली होती. अनेक बांधकामे, मुख्यतः झोपडपट्ट्या या भूभागांवर आधीच अस्तित्वात असल्याने, काही दिवसांपूर्वी या विषयी मोठा गहजब झाला. 2018 मध्ये अशा भूभागांविषयी आवाजाची धार वाढल्याने हिल टॉप /हिल स्लोप (टेकडी/उतार) लागू करण्याचा निर्णय स्थगित ठेवण्यात आला.

सध्या सरकारने काही भूखंड आरक्षित करून हा मुद्दा समोर आणला आहे. याची सुरूवात राज्य सरकारने 2023 मध्ये बडे मासे आणि विकासक यांच्या मालकीच्या अशा 11 भूखंडांसाठी पुणे महानगरपालिकेचे मत मागितल्यापासून झाली. पुणे महानगर पालिकेचे तत्कालीन महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी हिल टॉप /हिल स्लोप (टेकडी/उतार) क्षेत्रातून निवडक भूखंड हटविण्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी सकारात्मक मत दिले.

पुणे महानगर पालिकेच्या या मताच्या आधारे, राज्य सरकारने अलिकडेच हिल टॉप /हिल स्लोप (टेकडी/उतार) क्षेत्राच्या मध्यभागी असलेल्या तीन भूखंडांचे आरक्षण रद्द करण्यासाठी आक्षेप आणि सूचना मागण्याचा आदेश जारी केला. हे तीन भूखंड संजय बाफना या व्यक्तीच्या मालकीचे आहेत. जमीन नोंदींनुसार हे भूखंड विकासक सचिन ईश्वरचंद गोयल चालवत असलेल्या कंपन्यांना विकले गेले आहेत. जवळपास 7 एकरच्या या भूखंडात 2,100 कोटी रुपयांची विकास क्षमता आहे.






दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.